## निशाणी क्र. १७२ वरील आदेश

प्रतिवादी क्र.२ हिने प्रस्तुतचा अर्ज देवगड पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र.१०/२०११ चे कामी जप्त केलेले व या न्यायालयातील नियमित फौजदारी खटला ०८/२०१५ चे कामी दोषारोपपत्रासोबत हजर केलेले दि. ०६/१२/२०१० इ. रोजी प्रतिवादी क्र.२ ही विक्रोळी, मुंबई येथे तिच्या नोकरीवर हजर असलेबाबतचे अस्सल अभिलेख व त्यासोबतचे दि. २७/०७/२०११ रोजीचे कंपनीने दिलेले अस्सल पत्र दाव्याचे कामी मागवून घेणेसाठी दाखल केला आहे. तिच्या म्हणण्यानुसार प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरूध्द् दावा मिळकतीचे वाटप होवून मिळणेकरिता दाखल केला आहे. तिने याकामी कैफियत सादर केली आहे व तिच्या हिश्श्याचे वाटप करून मागितले आहे. या कामी प्रतिवादी क्र.१ मयत असून तो तिचा सख्खा भाऊ होता. प्रतिवादी क्र.३ ही प्रतिवादी क्र.२ ची सख्खी बहीण आहे. यातील प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी संगनमत करून प्रतिवादी क्र.२ हिचे एक खोटे आणि बनावट मुखत्यारपत्र बनवून त्याआधारे दि.०७/१२/२०१० रोजी दावा मिळकतीची दोन वेगवेगळी खरेदीखते प्रतिवादी क्र.१३ च्या नावे केलेली आहेत. सदर खरेदीखतास वापरलेल्या मुखत्यारपत्रावर प्रतिवादी क्र.२ ची खोटी सही केली आहे व खोटया अंगठयाचा ठसा उमटविलेला आहे. सदर दि. ०६/१२/२०१० रोजी प्रतिवादी ही देवगड कार्यकारी दंडाधिकारी यांचेसमोर आलेलीच नव्हती, ती मुंबई येथे तिच्या नोकरीवर हजर होती. तिच्या अनुपस्थितीत तिची खोटी सही व खोटा अंगठयाचा ठसा करून सदरचे कथित आणि बनावट मुखत्यारपत्र पूर्ण करण्यात आले आहे. त्याबाबत प्रतिवादी क्र.२ ने तिच्या कैफियतीमध्ये सविस्तर कथन केले आहे. पोलिसांनी सदर गुन्हयाचे कामी प्रतिवादी क्र.२ नोकरी करीत असलेल्या कॅप जेमिनी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडून कथित मुखत्यारपत्राच्या दिवशी म्हणजेच दि. ०६/१२/२०१० रोजी प्रतिवादी क्र.२ ही तिच्या नोकरीवर विक्रोळी मुंबई येथे

हजर असलेबाबतचे अस्सल अभिलेख मागविलेले आहे. सदर अस्सल अभिलेख व त्यासोबतचे दि.२७/०७/२०११ इ. रोजीचे कंपनीने दिलेले अस्सल पत्र हे कागदपत्र देखील या दाव्याचे कामी मागवून घेणे अत्यंत आवश्यक व जरूरीचे आहे. सबब, सदरचे कागदपत्र या दाव्याचे कामी मागवून घेणेत यावेत अशी प्रस्तुत प्रतिवादीने विनंती केली आहे.

२. वादींना पुरेशी संधी देवून देखील त्यांनी नि.क्र.१७१ वर म्हणणे दाखल केले नाही. सबब, सदरचा अर्ज त्यांच्या विरूध्द् विना म्हणणे चालविणेत आला आहे.

३. प्रतिवादी क्र.३ हिने नि.क्र.१८० ला म्हणणे दाखल केले आहे. तिच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र.१ व ३ यांचेविरूध्द् केलेले संगनमताचे आरोप हे सर्वस्वी खोटे व काल्पनिक आहेत. प्रतिवादी क्र.३ हिने कोणतेही खोटे अथवा बनावट कागदपत्र केलेले नाहीत अथवा खोटया सहया देखील केलेल्या नाहीत त्या संदर्भात खोटी सही अथवा अंगठा केलेला नाही. गु.र.क्र. १०/२०११ चे कामी पोलिसांनी असे कथित कागदपत्र जप्त केले अथवा नाही किंवा जप्त केले असता ते कोणाकडून केले याची प्रतिवादी क्र.३ हीस माहिती नाही. अस्सल कुलमुखत्याराचा लेख तसेच हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल वगैरे कागदपत्र प्रतिवादी क्र.२ हिला याकामी मागविणेची प्रामाणिक इच्छा असती तर संबंधित कागदपत्र तिने याकामी तिचा सरतपास तसेच उलटतपास होणेपूर्वी मागविणे कायदयाने आवश्यक होते. परंतु, योग्य वेळी संबंधित कागदपत्र न्यायालयाचे रेकॉर्डवर न मागविता प्रतिवादी क्र.२ ची जबानी तसेच उलटतपास पूर्ण झालेनंतर सदरील कागदपत्र रेकॉर्डवर आणलेस प्रतिवादी क्र.३ चे वतीने प्रतिवादी क्र.२ ची उलटतपासणी घेणेची संधी प्रतिवादी क्र.३ हिला नाकारले सारखे होवून तिचे बचावाचे पावित्र्यावर अनिष्ट परिणाम होईल व तिचे नुकसान होईल. कोणत्याही कारणे प्रतिवादी क्र.२ चा अर्ज मंजूर करणे झाल्यास

प्रतिवादी क्र.२ हिची अशा कागदपत्रांसंबंधात उलटतपासणी घेणेचा प्रतिवादी क्र. ३ हिचा हक्क राखून व तिला तशी मोकळीक ठेवणेत यावी. सबब, या कारणास्तव प्रतिवादी क्र.२ हिने उशिरा दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज फेटाळणेची विनंती प्रतिवादी क्र.३ हिने केली आहे.

४. प्रतिवादी क्र.२ व ३ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रतिवादी क्र.२ हिने प्रतिवादी क्र.१ व ३ यांना मुखत्यारपत्र बनवून दिले, त्यावर प्रतिवादी क्र.२ ने सही केली आहे अगर अंगठयाचा ठसा उमटवला आहे ही बाब प्रतिवादी क्र.२ ने कैफियतीमध्ये स्पष्टपणे नाकारली आहे असे दिसून येते. ज्या मुखत्यार पत्राच्या आधारे प्रतिवादी क्र.१३ च्या नावे दावा मिळकतींची खरेदीखते झाली आहेत त्या मुखत्यारपत्राबाबत वाद असल्याचे दिसून येते. या प्रकरणा संदर्भात फौजदारी गुन्हा दाखल झाला आहे याबाबत वाद नाही असे दिसून येते. त्यामुळे वर नमूद वाद निवारणाकरिता सदर मुखत्यारपत्र ज्या दिवशी बनविण्यात आले त्या दिवशी प्रतिवादी क्र.२ ही तिच्या मुंबई येथील कंपनीमध्ये कार्यरत होती याबाबतचे अभिलेख याकामी दाखल होणे आवश्यक व गरजेचे आहे असे मला वाटते.

६. मात्र, सदर कागदपत्र हे संदर्भीय फौजदारी प्रकरणामध्ये समाविष्ट केले आहेत असे प्रस्तुत प्रतिवादीचेच म्हणणे आहे. सदर अस्सल कागदपत्र हे फौजदारी प्रकरणामध्ये देखील आवश्यक असणार आहे. त्यामुळे त्या प्रकरणातील अस्सल कागदपत्राची सहीशिक्कयाची प्रत काढून घेवून या कामी प्रस्तुत प्रतिवादी दाखल करू शकते. अशा सहीशिक्क्याच्या प्रतीबाबत भारतीय पुरावा अधिनियम कलम ६५ मध्ये नमूद केलेल्या कारणास्तव प्रस्तुत प्रतिवादी दुय्यम पुरावा सादर करू शकते. त्यामुळे सदर फौजदारी प्रकरणातील समाविष्ट

केलेले अस्सल कागदपत्र या कामी दाखल करणेकरिता समन्स काढणेची गरज नाही असे मला वाटते.

७. सबब, वरील सर्व कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

**— आदेश —**

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( गि. सु. माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

स्थळ : देवगड
दिनांक : २५/०७/२०१८